**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ५४ दिनांक २६/०९/२०२४**

# दिनांक २९/०९/२०२४ रोजी लोकअदालत असल्याने पालघर जिल्ह्यातील अनपेड ई-चलान वाहनधारकांनी दि.२८/०९/२०२४ रोजीपर्यंत दंड भरणे बाबत.

याव्दारे असे आवाहन करण्यात येते की, राज्यात महाराष्ट्र शासनाचा **"वन स्टेट वन ई-चलान"** संपुर्ण राज्यात कार्यान्वित झालेला असुन सदर प्रकल्पांतर्गत वाहतुक नियमांचे उल्लंघन करणा-या कसुरदार वाहन धारकांवर ई-चलान प्रणालीव्दारे कारवाई करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यातील आजपावेतो दंड न भरलेले वाहनधारक यांचे अनपेड ई- चलानची संख्या जास्त प्रमाणात असुन सदरची अनपेड ई- चलानची रक्कम ही खुप मोठया प्रमाणात आहे. सदर ई-चलान प्रणालीद्वारे कारवाई करण्यात आलेल्या वाहनाधारकांना एसएमएस संदेशाद्वारे सदर चलनाची तडजोड रक्कम भरणेबाबत सुचना देण्यात येतात. परंतु बऱ्याच वाहनधारकाने अदयापपावेतो अनपेड ई-चलान तडजोड रकमेचा भरणा केलेला नाही. अशा अनपेड ई-चलान वाहन धारकांनी दिनांक २९/०९/२०२४ रोजी लोकअदालत असल्याने खालील नमुद ठिकाणी अनपेड ई-चलान तडजोड रक्कमेचा भरणा करु शकतात.

- **रोख रक्कम रोख स्वरुपात अथवा डेबीट कार्डद्वारे, क्रेडीट कार्डद्वारे पालघर पोलीस ठाणे स्टेशन चौकी शेजारी, जिल्हा वाहतुक शाखा चौकी, रेल्वे स्टेशन, पालघर (पश्चिम) ता. जि. पालघर येथे भरु शकता.**
- **वाहतुक अंमलदार यांचेकडे खालील नमुद ठिकाणी ई-चलान डिवाईसद्वारे अनपेड रक्कम भरु शकता.**

- **पालघर विभाग :-(वाहतुक शाखा रेल्वे स्टेशन चौकी, चाररस्ता, पाचबत्ती,)**
- **बोईसर विभाग :- (बोईसर रेल्वे स्टेशन चौकी,मधुरनाका, ओसवाल नाका)**
- **कासा विभाग :- (चारोटी कोस्टल चौकी, चारोटी नाका )**
- **तलासरी विभाग :- (तलासरी नाका चौकी )**
- **वाडा विभाग :- (खंडेश्वरी नाका, कुडुस चौकी )**
- **डहाणु विभाग :- (सागर नाका)**
- **सफाळा विभाग :- ( रेल्वे फाटक सफाळा (पुर्व)**
- **तसेच वाणगांव, घोलवड, जव्हार, विक्रमगड, मोखाडा, या विभागातील वाहतूक अंमलदार यांचेकडे ई चलान डिवाईसद्वारे अनपेड रक्कम भरु शकता.**

तरी वरीलप्रकारे आपले वाहनावरील अनपेड ई-चलान तडजोड रक्कम ही दि.२९/०९/२०२४ रोजी होणाऱ्या लोकअदालत पुर्वी भरावी. आपले वाहनांवरील अनपेड ई-चलान तडजोड रक्कम भरलेनंतर त्याची रितसर पावती घ्यावी. तरी वाहतूक नियमांचे पालन करुन नागरीकांनी पोलीसांना सहकार्य करावे असे पालघर जिल्हा वाहतुक शाखेकडून आवाहन करण्यात येत आहे.